**शपथेवर पुढील सरतपास श्रीमती.देशमुख वकील मॅडम गैरअर्जदारातर्फे**

२.        शपथपत्र नि.क्र.सि.—०९   मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**उलटपास  अर्जदार यांच्या तर्फे श्री.शिकारे प्रतीनिधी:—**

०४.        हे म्हणने खरे आहे की, दि.०८/१२/२०१० रोजी विभाग नियंत्रक यांनी एस.डबलु.नेवलकर सुरक्षा रक्षक यांची वैद्यकिय तपासणी करण्यासाठी वैद्यकिय जिल्हा शल्य चिकीत्सक, चंद्रपुर यांचेकडे तपासणीकरीता पत्र दिले होते. सदर पत्राला **नि.यु.४** देण्यात आले. हे म्हणने खरे आहे की,  सदर पत्र हे आस्थापना शाखेने दिलेले असल्याने जिल्हा शल्य चिकीत्सक यांचा रिपोर्ट सुध्दा आस्थापनेला प्राप्त होईल.  जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी एस.डबलु. नेवरकर यांचा वैद्यकिय तपासणीचा अहवाल पाठविल्याचा आस्थापना शाखेमध्ये नोंद नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, एस.डब्लु. नेवलकर यांचा जिल्हा शल्य चिकीत्सक यांचा अहवाल प्राप्त झाल्याशिवास त्यांना कर्तव्यावर रूजु करून घेणे शक्य नव्हते. मला सांगता येणार नाही की, जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडून वैद्यकिय अहवाल प्राप्त करून घ ोतल्याशिवाय नेवलकर यांचेविरूध्द बडतर्फीची कार्यवाही करणे शक्य नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मयत कामगाराची बडतर्फ चुकीची आहे. हे म्हणने खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिलेले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)

न्यायाधीश

दि. १८.११.२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर